A-2 Kaveri CHS, Plot No.63
Sector 17, Vashi
Navi Mumbai - 400 705. INDIA
Phone : +91 (022) 68835801
Email : companysecy@twltravel.com
Website : www.tradewings.in

To,
**BSE Limited,**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai- 400001.

**Dear Sir/ Madam,**

**Ref: Trade Wings Limited (Scrip Code: 509953)**

**SUB: Submission Of Newspaper Copies of Publication of Audited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Year Ended March 31, 2026.**

In terms of Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company has published Extract of Statement of Audited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Year ended on March 31, 2026, which have been considered, approved and taken on record by the Board of Directors, at their meeting held on Wednesday, 27th May, 2026.

The said financial results have been published in 'Times of India' (English Newspaper) Goa edition dated 29.05.2026 & in 'Pudhari' (Marathi newspaper) Goa edition dated 29.05.2026.

Further, in pursuance of Regulation 30 read with Part A of Schedule III enclosed herewith please find below the copy of Newspaper articles as published in abovementioned newspapers.

Kindly take the above on record and oblige.

Thanking you,
**For and on behalf of**
**TRADE WINGS LIMITED**

TRADE-WINGS LIMITED

**Zurica Kevin Pinto**
**Company Secretary and Compliance Officer**
**Membership Number: A27623**

**Date: 29th May 2026**
**Place: Mumbai**

## पर्वरी मॉलकडे वाहतूक पोलिस नेमा

**पर्वरी :** पर्वरीत उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने वाहतुकीत बदल करण्यात आल्याने येथील मॉलकडे वाहतूक कोंडी होत आहे. मॉलकडे दोन्ही बाजूने वाहतूक होत असल्याने अपघाताचा धोका आहे. त्यामुळे येथे वाहतूक पोलिस नेमावा, अशी मागणी होत आहे.


**पणजी महानगरपालिका**
कर विभाग
पणजी-गोवा

दूरध्वनी क्र. २२२३३३९/२४२२७३६/२४२३५५६/२४२३५५७ फॅक्स क्र. २४२६९९८
वेबसाइट: www.ccpgoa.com / ईमेल: commissioner@ccpgoa.com

संदर्भ क्र. १३/२२/टॅक्स/जीईएन/सीसीपी/२०२६-२७/१६५३ दिनांक: २६/५/२६

**प्रेस नोट**

पणजी महानगरपालिका क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील सर्व करदाते/मालक/परवानाधारक यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी चालू थकबाकीवर व्याज आकारणी टाळण्यासाठी त्यांचे महानगरपालिका कर जसे की, घरपट्टी, व्यापार आणि व्यवसाय कर, साइन बोर्ड कर, स्वच्छता शुल्क भरताना पूर्वीच्या कराच्या पावत्या सादर करून करावेत.कर भरण्याची अंतिम मुदत **३०.०६.२०२६** पर्यंत वाढवण्यात आली आहे, ज्यानंतर नियमानुसार लागू असलेले व्याज आकारले जाईल. ऑनलाईन पेमेंटसाठी www.ccpgoa.com या वेबसाइटला भेट द्या.

सही/- (रोहित जो मोंसेरात) महापौर

सही/- (क्लेन मदेरा) आयुक्त

**डीआय/जाहिरात/५०४/२०२६**


# कुडचडेच्या राजकारणात गुलाबी ट्विस्ट

## नगरसेवकांच्या लीलांची सोशल मीडियावर जोरदार चर्चा : राजकीय पक्षांची सावध भूमिका

**मडगाव : पुढारी वृत्तसेवा**

कुडचडे-काकोडा पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. पालिकेवर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी विविध नेत्यांकडून जोरदार हालचाली सुरू असतानाच काही विद्यमान नगरसेवकांच्या कथित 'गुलाबी लीलां'ची चर्चा समाजमाध्यमांवर रंगू लागल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

कुडचडे-काकोडा नगरपालिका मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने आता नवीन मंडळाच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. पालिका निवडणुकीबरोबरच आगामी विधानसभा निवडणुकीचेही बिगुल कोणत्याही क्षणी वाजू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे पालिका निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची लढत न राहता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शक्तिपरीक्षा मानली जात आहे.


नीलेश काब्राल


अमित पाटकर


रोहन गावस देसाई

कुडचडे मतदारसंघात भाजपचे आमदार नीलेश काब्राल यांचे वर्चस्व असले तरी यंदा त्यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी राहत आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत अमित पाटकर यांनी त्यांना जोरदार टक्कर दिली होती. आता बीसीसीआयचे माजी सरचिटणीस रोहन गावस देसाई यांच्याकडूनही काब्राल यांना कडवे आव्हान मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विविध सामाजिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आणि शक्तिप्रदर्शनाच्या माध्यमातून दोन्ही नेते मतदारसंघात स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसत आहेत. या वाढत्या राजकीय स्पर्धेमुळे नगरसेवक, स्थानिक पदाधिकारी आणि पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस आल्याची चर्चा रंगू लागली आहे. विविध गटांकडून कार्यकर्त्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी हालचाली सुरू असून, पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आणखी तापू लागले आहे.

पालिका निवडणुकीत स्वतःचे पॅनल निवडून आणण्यासाठी संभाव्य उमेदवारांकडून विद्यमान नगरसेवकांना आपल्या गोटात ओढण्याचे प्रयत्न गेल्या काही महिन्यांपासून सुरू होते. अनुभवी नगरसेवकांच्या माध्यमातून पालिकेवर सत्ता मिळवून आगामी विधानसभा निवडणुकीत स्वतःचे राजकीय वजन वाढवण्याचे अनेकांचे गणित आहे. स्वतःचा राजकीय दबदबा निर्माण करण्यासाठी काही नगरसेवकांचे सर्व लाड पुरवले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर काही नगरसेवकांची कथित विलासी आणि खासगी प्रकरणे चर्चेत आल्याने इच्छुक उमेदवारांच्या अडचणी वाढल्या आहेत.

समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या व्हिडिओंमुळे कुडचडे मतदारसंघात मोठी खळबळ उडाली आहे. याआधी अल्पवयीन मुलींच्या अश्लील व्हिडिओ प्रकरणामुळेही या मतदारसंघाची बदनामी झाली होती. त्या प्रकरणात क्राईम ब्रँचकडून आरोपपत्र दाखल करण्यात आल्याने वातावरण आधीच तापलेले असताना आता विद्यमान नगरसेवकांशी संबंधित नव्या चर्चांमुळे राजकीय पक्ष सावध झाले आहेत.

### विधानसभेत बहुरंगी लढत शक्य...

कुडचडे मतदारसंघात भाजप, काँग्रेस, आम आदमी पक्ष, गोवा फॉरवर्ड आदी पक्षांकडून चाचपणी सुरू आहे. नगरपालिकेतील काब्राल यांचे कट्टर विरोधक बाळकृष्ण होडरकर यांचे नावही चर्चेत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत बहुरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत पालिकेवर स्वतःचे पॅनल निवडून आणणे हे प्रत्येक राजकीय गटासाठी प्रतिष्ठेचे ठरणार आहे.


**ट्रेड विंग्ज लिमिटेड**

**सीआयएन :** L63040GA1949PLC000168
**नोंदणीकृत कार्यालय पत्ता : १ला मजल, नाईक बिल्डिंग, डॉन बॉस्को हायस्कूल समोर, महात्मा गांधी रोड, पणजी, गोवा -४०३ ००१**
**टेलिफोन : ९१-८३२२२२४५७६, ई-मेल :** companysecy@twltravel.com, **वेबसाईट**- www.tradewings.in

३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी वार्षीक लेखापरिक्षीत स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड आर्थिक रिझल्ट्सचा अंश

(रूपये लाखात दर शेअर मूल्य वगळता)

| (अलेखापरिक्षीत) | स्टॅण्ड अलोन | | | | कन्सोलेटेड | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाही समाप्ती | | वर्ष अखेर | | वर्ष अखेर | |
| | ३१.०३.२०२६ (लेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२६ (लेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२६ (लेखापरिक्षीत) | ३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत) |
| व्यवहारांपासूनची एकूण मिळकत | ५६८४.९५ | ५२२६.०० | २२५९४.५६ | २१२८५.२९ | २६२१०.९९ | २४९८०.४४ |
| (करपूर्व कालावधीसाठी, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तू) निव्वळ नफा/(तोटा) | ६८.६७ | १२२.८८ | ७७.८८ | ६०.८० | १७२.६३ | ३६१.५२ |
| करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तूंनंतर) | ६८.६७ | १२२.८८ | ७७.८८ | ६०.८० | १७२.६३ | ३६१.५२ |
| करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तूंनंतर) | १०४.२२ | ११९.२९ | ११३.४३ | ५७.२१ | २३९.३७ | ३८०.३४ |
| कालावधीसाठी एकूण व्यापक मिळकत ((करोत्तर)कालावधीसाठीचा नफा आणि इतर व्यापक मिळकत (करोत्तर)सहीत) | ३०.१५ | १११.१३ | ३९.३७ | ४९.०५ | १६९.६५ | ३७७.६६ |
| अदा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रू.१०) | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० | ३००.०० |
| मागील वर्षाच्या ऑडीटेड ताळेबंदमध्ये दाखवण्यात आलेले रिझर्व्हस (रिव्हॅल्यूएशन रिझर्व्हस वगळून) | ०.०० | ०.०० | -११६.२० | -१५७.१८ | -१२५५.४७ | -१४२६.७८ |
| दर शेअर मिळकत (असामान्य वस्तूंपूर्वी) (दर्शनी मूल्य रू.१०/- प्रत्येकी) (चालू व्यवहारांसाठी) | | | | | | |
| बेसिक | ३.४७ | ३.९८ | ३.७८ | १.९१ | ७.९८ | १२.६८ |
| डायल्युटेड | ३.४७ | ३.९८ | ३.७८ | १.९१ | ७.९८ | १२.६८ |
| दर शेअर मिळकत (असामान्य वस्तूंनंतर) (दर्शनी मूल्य रू.१०/- प्रत्येकी) (चालू व्यवहारांसाठी) | | | | | | |
| बेसिक | ३.४७ | ३.९८ | ३.७८ | १.९१ | ७.९८ | १२.६८ |
| डायल्युटेड | ३.४७ | ३.९८ | ३.७८ | १.९१ | ७.९८ | १२.६८ |

**नोट :** (१) वरील उतारा हा, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या, ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या वार्षिक स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. वार्षिक स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.tradewingr.in वर उपलब्ध आहे.
(२) वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या २७ मे २०२६ रोजी झालेल्या संबंधित बैठकीत ते नोंदवून घेतले आहेत. चालू तिमाही आणि आर्थिक वर्षाच्या निकालांचे लेखापरीक्षण कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून केले जाते.
(३) वित्तीय निकालांमध्ये त्याच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी - ट्रेड विंग्स हॉटेल्स लि. मधील गुंतवणुकीच्या घसाऱ्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही, कारण व्यवस्थापन चालू व्यवसाय आधारावर उपकंपनीच्या निकालांमध्ये सकारात्मक कल अपेक्षित आहे.
(४) ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या वर्षाची आकडेवारी कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासली आहे. वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल बिनशर्त आहे. ३१ मार्च, २०२६ आणि ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीची आकडेवारी ही, संपूर्ण आर्थिक वर्षांच्या लेखापरीक्षित आकडेवारी आणि संबंधित आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरपर्यंतच्या प्रकाशित, लेखापरीक्षित नसलेल्या वर्ष-आजपर्यंतच्या आकडेवारीमधील ताळमेळ साधणारी आकडेवारी आहे, जिची कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी मर्यादित समीक्षा केली होती.
(५) हे आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार वेळोवेळी सुधारित केलेल्या संबंधित नियमांसह आणि डएइख (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ (सूचीबद्धता नियम) च्या नियम ३३ नुसार Ind-AS १०८, कार्यरत विभाग, कंपनीच्या लेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित आर्थिक निकालांमध्ये विभाग माहिती प्रदान केली आहे.
(६) या कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत होण्यासाठी, आवश्यक तेथे मागील कालावधीतील आकडेवारीची पुनर्गठन / पुनर्वर्गीकरण करण्यात आले आहे.
(७) भारत सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू केलेल्या चार नवीन कामगार संहितांनुसार, ज्या २९ विद्यमान कामगार कायद्यांचे एकत्रीकरण आणि सुसूत्रीकरण करतात, कंपनीने आर्थिक निकालांवरील परिणामांचे मूल्यांकन केले आहे आणि ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षाच्या आर्थिक निकालांमध्ये, अनुक्रमे ग्रॅच्युइटी रु. ५९.१८ आणि भरपाईसह अनुपस्थिती रु. ११.१५ या दायित्वापोटी ७०.३४ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद नोंदवली आहे. कंपनी नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीशी संबंधित घडामोडींवर लक्ष ठेवून आहे आणि अंतिम नियमांच्या अधिसूचनेच्या आधारावर अंदाजांचे पुनरावलोकन करेल.


ट्रेडविंग्स लिमिटेड करिता
सही/-
**डॉ. शैलेंद्र पी. मित्तल,**
डीआयएन : ००२२१६६१
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण: मुंबई
दिनांक: २७ मे २०२६.


# सांताक्रुज येथे पदपथामुळे रस्त्याचा होणार कालवा

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**

सांताक्रुज मतदारसंघात मळा चार खांब ते सांताक्रुज मैदान या मार्गावर सुमारे दोन किलोमीटर नवा पदपथ बांधण्यात आलेला आहे. बराच रुंद असा हा पदपथ बांधताना बाजूला संरक्षण भिंतही बांधण्यात आली आहे. मात्र, हा पदपथ बांधताना पाण्याचा निचरा होण्यासाठी मार्गच न ठेवल्याने पावसाळ्यात या रस्त्याचे रुपांतर कालव्यात होण्याची भीती आहे.


**पणजी : सांताक्रुज रस्त्यावर बांधलेल्या पदपथामुळे साचलेले पाणी.**

सांताक्रुज मतदारसंघांमध्ये अनेक समस्या आहेत. चिंबल येथील पंचायतीची इमारत मोडकळीस आली आहे. असे असताना तिथे पैसा खर्च न करता करोडो रुपयांचा नवा पद पथ बांधण्यात आला आहे. हा पदपथ बांधताना पावसाचे पाणी निचरा होऊन बाहेर जाण्यासाठी योग्य तो मार्ग न ठेवल्यामुळे हल्लीच पडलेल्या लहानशा पावसातच या रस्त्यावर पाणी साचत आहे. पावसाळ्यात जोरदार पाऊस झाल्यावर या रस्त्याला कालव्याचे स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता आहे.

रस्त्याच्या दुसऱ्या बाजूलाही उंच पदपथ बांधलेला असून पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार नाही. त्यामुळे स्वरुप जोरदार पावसावेळी रस्ता पाण्याने तुंडुब भरुन जाईल व त्याला कालव्याचे स्वरुप प्राप्त होऊन वाहन चालकांची त्रेधातिरपट होण्याची शक्यता आहे.

## महिलेचा पाठलाग; गुन्हा दाखल

**दाबोळी : पुढारी वृत्तसेवा**

वास्को पोलिसांनी नवेवाडे येथील रहिवाशाविरुद्ध एका महिलेचा अनेक महिन्यांपासून पाठलाग करणे, छळ करणे आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने आरोप केला आहे की, १४ नोव्हेंबर २०२५ ते १२ मे २०२६ दरम्यान, नवेवाडे येथील त्रिलोकनाथ केरकर नावाच्या आरोपीने एका कौटुंबिक कार्यक्रमात ओळख झाल्यानंतर तिचा वारंवार पाठलाग केला आणि तिचा छळ केला. तसेच त्याने सर्वांसमक्ष अश्लील टिप्पणी करून आणि घाणेरडे हावभाव करून अपमान केला. त्यानंतर त्याने तिच्या कुटुंबीयांना गंभीर परिणामांची धमकी दिल्याचा आरोप आहे.

# गोमेकॉमध्ये रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने गोवा वैद्यकिय महाविद्यालय व इस्पितळात (गोमेकॉ) विविध रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

राज्य सरकारने भरती आयोगातर्फे नोकर भरती सुरू केली आहे. मात्र त्यामुळे आरोग्यमंत्री विश्वजित राणे नाराज झाले होते. राणे यांनी आपल्याकडे असणाऱ्या विविध खात्यांमध्ये सत्तरीतील लोकांची खोगीर भरती केल्याचा आरोप अनेक सामाजिक कार्यकर्ते वारंवार करत असतात.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कर्मचारी भरती आयोगातर्फे सरकारी नोकर भरती सुरू केल्यामुळे पात्र युवक युवतींना सरकारी नोकऱ्या मिळत आहेत. मात्र, आपणास हवी तशी नोकर भरती करता येत नसल्याने नाराज झालेले विश्वजित राणे यांनी हल्लीच मुख्यमंत्री जादुगार आहेत, ते निवडणुकीपूर्वी २२ हजार नोकऱ्या उपलब्ध करतील. त्यात सत्तरीच्या लोकाना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळतील, असे म्हटले होते. मात्र मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी २२ हजार नोकऱ्यांचा दावा फेटाळत, शक्य तेवढ्या जास्त नोकऱ्या उपलब्ध केल्या जातील, आतापर्यंत कर्मचारी भरती आयोगातर्फे २५०० जणांना नोकऱ्या दिल्या असून भविष्यातही भरती ही आयोगातर्फेच केली जाणार असून आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी आपल्या खात्यांतील रिक्त जागांची यादी द्यावी, त्या जागा भरू, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते.

राज्य सरकारने गोमेकॉ बांबोळी येथील विविध पदे भरण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

### कृषी महाविद्यालयात १५ जागा

गोवा कृषी महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापकाची १५ पदे भरण्यासाठी सरकारने प्रक्रिया सुरू केली आहे. यातील ८ पदे कंत्राटी तत्वावर व ७ पदे व्याख्याता तत्वावर भरली जाणार आहेत.

# बांगलादेशी नागरिकांसाठी तपासणी मोहीम

**पणजी: पुढारी वृत्तसेवा**

राज्यात अवैधरीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात गोवा रेल्वे पोलिसांनी व्यापक तपासणी मोहीम सुरू केली असून, प्रमुख रेल्वे स्थानकांवर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. मडगाव, थिवी, काणकोण, वास्को तसेच उत्तर गोव्यातील काही बस स्थानकांवर ही रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि स्थानिक पोलिसांकडून संयुक्त तपासणी केली जात आहे.

रेल्वे मार्गाचा वापर करून राज्यात प्रवेश करणाऱ्या संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून, स्थानक परिसरात येणाऱ्या प्रवाशांची ओळखपत्रे, प्रवासाची कागदपत्रे आणि राहण्याचा तपशील तपासला जात आहे. पोलिसांनी काही ठिकाणी अचानक तपासणी मोहीम राबवत संशयितांची चौकशी सुरू केली आहे.

अवैध घुसखोरी, बनावट कागदपत्रांचा वापर आणि संशयास्पद हालचाली रोखण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

राज्यातील संवेदनशील भाग, कामगार वसाहती आणि भाडेकरूंची माहितीही स्थानिक पोलिसांकडून पडताळली जात आहे.

दरम्यान, रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे देखरेख वाढविण्यात आली असून, संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच परदेशी नागरिक कायद्यांतर्गत आवश्यक ती कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## बायणा येथून उपकरणे चोरीस

**वास्को :** बायणा येथील मुरगाव बंदर प्राधिकरणाच्या निवासी इमारतीच्या गच्चीवरील सुमारे १ लाख ३० हजार रुपये किंमतीची दोन उपकरणे चोरीप्रकरणी प्रणेश मदार (रा. मांगोरहिल) याच्याविरोधात मुरगाव पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या चोरीप्रकरणी सिंधुदुर्ग –महाराष्ट्र येथील गडार्क लॅब प्रा. लिमिटेडचे वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ शिरिषकुमार राणे यांनी तक्रार गेली आहे. सदर चोरी १५ मेपूर्वी करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. बायणातील रवींद्र भवननजीकच्या मुरगाव बंदर प्राधिकरणाच्या निवासी इमारीतीच्या गच्चीवर सदर कंपनीच्या मालकीची दोन उपकरणे बसविण्यात आली होती. त्यामध्ये एक श्वसनीय धूळ नमुना व एक सूक्ष्म कण नमुना या उपकरणाचा समावेश होता. ती उपकरणे चोरीस गेली होती. सदर उपकरणे प्रणेश याने चोरली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मुरगाव पोलिस स्थानकाचे उपनिरीक्षक सूरज नाईक हे पुढील तपास करीत आहेत.


**GKB OPHTHALMICS LIMITED**
CIN : L26109GA1981PLC000469
**नोंदणीकृत कार्यालय : १६-ए, थिवी औद्योगिक वसाहत, म्हापसा गोवा ४०३५२६**
**फोन क्र. (०८३२) ६७१४४४४, ई मेल :** gkbophthalmics@gkb.net **वेबसाईट** : www.gkb.net

**३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षअखेर लेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांचा घोषवारा**

रु. लाखात, प्रतिशेअर मुल्य वगळता

| अ. क्र. | तपशील | स्टॅण्ड अलोन | | | | | कन्सोलेटेड | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही अखेर | | | वर्ष अखेर | | तिमाही अखेर | | | वर्ष अखेर | |
| | | ३१/०३/२६ | ३१/१२/२५ | ३१/०३/२५ | ३१/०३/२६ | ३१/०३/२५ | ३१/०३/२६ | ३१/१२/२५ | ३१/०३/२५ | ३१/०३/२६ | ३१/०३/२५ |
| | | लेखापरिक्षीत (संदर्भ नोट ३) | अलेखापरिक्षीत | लेखापरिक्षीत (संदर्भ नोट ३) | लेखापरिक्षीत | लेखापरिक्षीत | लेखापरिक्षीत (संदर्भ नोट ३) | अलेखापरिक्षीत | लेखापरिक्षीत (संदर्भ नोट ३) | लेखापरिक्षीत | लेखापरिक्षीत |
| १ | कामकाजातून एकूण उत्पन्न | ६४०.१८ | ४३६.१० | ८४२.६३ | २,५६४.४१ | ३,२७४.९४ | २,९७९.२७ | ५,६७९.३५ | ३,१०२.२९ | १४,९०६.३५ | १०,८९८.७६ |
| २ | निव्वळ नफा/(तोटा) कालावधीकरिता (करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपूर्व) | (४३.१७) | १२०.६५ | (२४३.८०) | (१८५.५०) | (६०३.६३) | २५७.०८ | ९७.३१ | (३९३.४५) | ४८९.३६ | (६७२.६२) |
| ३ | निव्वळ नफा/(तोटा) कालावधीकरिता (करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपश्चात) | (१९२.५७) | ९१.०६ | (२४३.८०) | (३६४.४९) | (६०३.६३) | १०७.६८ | ६७.७२ | (३९३.४५) | ३१०.३७ | (६७२.६२) |
| ४ | निव्वळ नफा/(तोटा) कालावधीकरिता (करपूर्व आणि अपवादात्मक बाबींपश्चात) | (१८८.३१) | ९८.०८ | (२४७.९५) | (३५६.७९) | (६१०.७९) | १११.९४ | ७०.७२ | (४१२.८८) | ३०२.७१ | (७०७.९२) |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (ज्यामध्ये कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) आणि इतर सर्व समावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट आहे. | (१७६.१९) | ११८.०५ | (२५९.७४) | (३३४.८८) | (६३१.१५) | (१०१.२४) | ४०.०९ | (४४६.८९) | (१०३.२६) | (८६१.२२) |
| ६ | समभाग मिळकत | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ | ५०४.०६ |
| ७ | प्रतिसमभाग मिळकत (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी) | | | | | | | | | | |
| | अ) बेसिक (रु. मध्ये) | (३.७४) | १.९५ | (४.९२) | (१७.०८) | (१२.१२) | ०.३८ | ०.८८ | (७.०३) | २.४२ | (१३.९८) |
| | ब) डायल्युटेड (रु. मध्ये) | (३.७४) | १.९५ | (४.९२) | (१७.०८) | (१२.१२) | ०.३८ | ०.८८ | (७.०३) | २.४२ | (१३.९८) |

**टीप :**
१. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहेत आणि २७ मे २०२६ रोजी झालेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या संबंधित बैठकांमध्ये त्यांना मान्यता देण्यात आली आहे, ज्यांचे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करण्यात आले आहे.
२. कंपनीचे कामकाज प्रामुख्याने प्लॅस्टिकपासून बनवलेल्या अपूर्ण ऑप्थॅल्मिक लेन्सच्या उत्पादन आणि व्यापाराशी संबंधित आहे. मुख्य परिचालन निर्णय घेणारे कंपनीच्या कामकाजाचे पुनरावलोकन एकच परिचालन विभाग म्हणून करतात. त्यामुळे स्वतंत्र विभागाची कोणतीही माहिती अहवालात दिलेली नाही.
३. ३१ मार्च २०२६ आणि ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे संपूर्ण मागील आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आकडे आणि संबंधित मागील आर्थिक वर्षांच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतचे प्रकाशित अलेखापरीक्षित वर्षाचे आकडे यांमधील संतुलित आकडे आहेत, जे वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन होते.
४. मागील वर्षाचे/कालावधीचे आकडे चालू कालावधीशी सुसंगत राहण्यासाठी जिथे आवश्यक असेल तिथे पुनर्वर्गीकृत / पुनर्रचना करण्यात आले आहेत.
५. वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार स्वरूपाचा एक उतारा आहे.
६. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर (www.bseindia.com) आणि कंपनीच्या वेबसाईटवर (www.gkb.net) उपलब्ध आहे.
७. उपरोक्त निष्कर्षांवर खाली दिलेल्या क्विक रिस्पॉन्स कोड द्वारे देखील प्रवेश केला जाऊ शकतो.

**ठिकाण : म्हापसा-गोवा**
**दिनांक : २७ मे, २०२६**

**जीकेबी ऑप्थालमिक्स लिमिटेड करिता**
**के.जी. गुप्ता**
व्यवस्थापकीय संचालक, डीआयएन : ०००५१८६३


## कुडचडेत कारची धडक; महिला जखमी

**मडगाव :** कुडचडे येथील गोविंदा पसरो-काकोडा परिसरात भरधाव कारने पादचारी महिलेला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात अँजेलिना फर्नांडिस (रा. व्हाडलेमळ, काकोडा-कुडचडे) या जखमी झाल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश नाईक (रा. दामाळ, सांगे) हा आपल्या कारने कुडचडेहून सांगेकडे जात होता. गोविंदा पसरो-काकोडा येथे पोहोचल्यावर त्याने निष्काळजीपणे व बेदरकारपणे वाहन चालवत पादचारी अँजेलिना फर्नांडिस यांना धडक दिली.

# कत्तलीसाठी डुकरांची बेकायदा वाहतूक

## तीन संशयितांवर गुन्हा दाखल : ३० डुकरांची सुटका

**पणजी: पुढारी वृत्तसेवा**

सुमारे ३० डुकरांची कत्तलीसाठी बेकायदा वाहतूक करण्यात येत होती. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित वाहन थांबवून सर्व डुकर जप्त केले व तिघांवर गुन्हा दाखल केला.

मनोज मेघवाल (वय २५, रा. कालापूर, सांताक्रूझ) यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५, ३२५ सहवाचनीय ३(५) आणि प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० च्या कलम ११(१)(डी), ११(१)(ई) अन्वये शिवकुमार टी. बी. पाटील, सुदीप भिस्तप्पा दोडामणी, आनंद केरूळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून ३० पाळीव डुकर जप्त करण्यात आले.

जुने गोवे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पणजी-बांबोळी परिसरात जीए-०९-एल-४७०१ या वाहनातून हे तीनही संशयित अंदाजे ३० डुकरांची योग्य हवा खेळती राहण्याची सोय, पुरेशी जागा आणि वैध कागदपत्रांशिवाय अत्यंत क्रूर आणि अमानवीय परिस्थितीत बेकायदेशीरपणे वाहतूक करत होते. तक्रारदार आणि त्याच्या पथकाने वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा चालकाने बेदरकार आणि धोकादायक पद्धतीने वाहन चालवले आणि घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांचा पाठलाग करून पकडण्यात आले. तपासणी दरम्यान, संशयित वैध वाहतूक कागदपत्रे, आरसी बुक आणि अनिवार्य पशुवैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र सादर करण्यास अयशस्वी ठरले.